**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १२ ची जबानी</u>**

मी याव्दारे शपथेवर सत्य निवेदन करतो की,

माझे नाव :- राष्ट्रपाल अशोक लोखंडे

वय सुमारे :- ३८ वर्षे, व्यवसाय :-पोलीस उप निरीक्षक, उदगीर ग्रामीण

पत्ता :- उदगीर ता. उदगीर जि. लातूर

**<u>सरतपासणी सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एस.व्ही. देशपांडे,</u>**

**०१.** जानेवारी २०२२ ते सप्टेंबर २०२३ या कालावधीमध्ये मी एमआयडीसी पोलीस स्टेशन लातूर येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होतो. दि. ८/२/२०२२ रोजी मी पोलीस स्टेशनमध्ये ड्यूटीवर असताना सायंकाळी एक फोन कॉल आला होता. अवंतीनगर येथे शेख यांच्या घरी एक खुन झाला आहे अशी माहीती मिळाली. त्या माहितीवरुन मी, पीआय व स्टाफ घटनास्थळी जप्तीचे साहीत्य गेलो. त्याठिकाणी काही लोक जमले होती. त्यातील एका इसमाने शेख यांचे घर दाखविले. आम्ही शेख यांच्या घरामध्ये जाऊन पाहीले असता त्याठिकाणी एक महिला मृत झाल्याचे दिसले. आम्ही तात्काळ म.न.पा. लातूर यांना पत्र देऊन दोन कर्मचारी पंच म्हणून मागविले. आता मला दाखविलेले पत्र हे तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाण पी-८२** देण्यात आले. सोबतच आम्ही श्वॉन पथक व अंगुलीमुद्रा तज्ञ यांनाही पाचारण केले. जमलेल्या महिलापैकी एक महिला पंच म्हणून घेतली. आम्ही घटनास्थळाचा पंचनामा पंचासमक्ष केला. आम्ही घटनास्थळाचे फोटोही काढले. घटनास्थळावरुन जप्त करण्यालायक वस्तु जप्त केल्या. घटनास्थळावर मृत अवस्थेत पडलेल्या महिलाच्या सर्वांगावर रक्ताचे डाग होते. त्या महिलेचे नाव रेश्मा अब्दुल शेख असे होते. तिच्या संपूर्ण शरीरावर धाराधार शस्त्राने वार केल्याने तिचे शरीर छिन्नविछिन्न दिसत होते. ती घरातील बेडवर उथान्या अवस्थेत पडलेली होती. तिच्या बाजुला फरशीवर लाकडी मुठ असलेला रक्ताने माखलेला बतई चाकू पडलेला होता. बेडच्या थोडे बाजुला खाली आधार कार्ड पडलेले होते. त्या आधार कार्डवर

अब्दुल युनुस शेख असे नाव, फोटो, पत्ता होता. मृत महिला जेथे पडलेली होती तेथून ते घराच्या बाहेरपर्यंत रक्ताचे डाग पडलेले होते. घरामध्ये फरशीवरही रक्त पडलेले होते. घरामध्ये संसार उपयोगी साहित्य व कपाट होते. त्यावरही रक्त पडलेले होते. घरामध्ये टीव्ही चालू होता व त्याचा आवाज मोठ्याने चालू होता. जप्ती लायक वस्तु जप्त केल्या. जप्त केलेल्या वस्तु मला दाखविल्यास मी ओळखू शकतो.

०२. आता मला दाखविलेला बतई चाकू हा तोच आहे. त्यास यापुर्वीच एमओ–१ देण्यात आलेले आहे. आता मला दाखविलेले केस हे तेच आहेत. सदर केसांना यापुर्वीच एमओ–२ देण्यात आलेले आहे. त्या मृत महिलेच्या हातात आखुड केस होते. आता मला दाखविलेले आखुड केस हे तेच आहे. त्यांना यापुर्वीच एमओ–३ देण्यात आलेले आहेत. मृत महिलेच्या बेडवर पडलेले रक्त कापसाच्या बोळाने घेतले तो कापसाचा बोळा जप्त केला. आता मला दाखविलेला कापसाचा बोळा हा तोच आहे. त्यास यापुर्वीच एमओ–४ देण्यात आलेले आहे. घराच्या बाहेर असणारी रक्त मिश्रित माती जप्त केली होती. आता मला दाखविलेली रक्त मिश्रित माती ही तीच आहे. त्यास यापुर्वीच एमओ–१० देण्यात आले आहे. घटनास्थळावरुन एक बेडशिट जप्त केले होते. आता मला दाखविलेले बेडशिट हे तेच आहे. त्यास यापुर्वीच एमओ–१३ देण्यात आलेले आहे. रुमच्या बाहेर गेट जवळ फरशीवर पडलेले रक्त कापसाच्या बोळ्याने जप्त केले होते तो कापसाचा बोळा जप्त केला. आता मला दाखविलेला कापसाचा बोळा हा तोच आहे. त्यास यापुर्वीच एमओ–११ देण्यात आलेले आहे. आता मला दाखविलेला घटनास्थळ पंचनामा हा तोच आहे. त्यास यापुर्वीच पी–४४ देण्यात आले आहे. आता मला दाखविलेले नऊ फोटो हे तेच आहेत. सदरचे फोटो घटनास्थळावरुन काढले होते. त्यांना यापुर्वीच एकत्रितपणे आर्टीकल १४ देण्यात आलेले आहे.

०३. सदर मृत महिलेचा मृतदेह सरकारी दवाखान्यात पाठविला व तात्काळ मरणोत्तर पंचनामा बनविला. आता मला दाखविलेला मरणोत्तर पंचनामा हा तोच आहे. त्यास यापुर्वीच निशाण पी. ४५ देण्यात आले. मरणोत्तर पंचनामा करत असताना मृतदेहाचे फोटोही

काढले होते. आता मला दाखविलेले १५ फोटो हे तेच आहेत. त्यांना यापुर्वीच एकत्रितपणे आर्टीकल–१५ देण्यात आलेले आहे.

**०४.** आम्हास घटनास्थळावरुन माहिती मिळाली होती की त्या महिलेस तिच्या पतीने मारले आहे. त्यामुळे आम्ही आरोपीला शोधण्याकरीता तपास पथके रवाना केली. आरोपी हा उदगीर येथे असल्याचे समजल्याने तपास पथकाने आरोपीस उदगीर येथून पोलीस स्टेशन येथे जमा केले. दि. ९/२/२०२२ रोजी पोलीस स्टेशनला गु.र.नं. ५९/२०२२ हा कलम ३०२ भा.दं.वि. च्या अपराधाकरीता गुन्हा नोंद करण्यात आला. पोलीस पथकाने आरोपीस पोलीस स्टेशन येथे हजर केले होते. आरोपीस त्याच्या अटकपुर्व वैद्यकीय तपासणी करीता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पीटल, लातूर येथे पाठविण्यात आले.

**कोर्टाची पहिल्या सत्राची वेळ संपल्याने व इतर महत्वाच्या कामामुळे पुढील सरतपास उद्यापर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत 'समक्ष'

( डी.बी.माने)

दिनांक :–२६/०३/२०२५. अति. सत्र न्यायाधीश, लातूर

**दिनांकः– २७/०३/२५**

**शपथेवर सरतपास पुढे सुरु**

**०५.** आरोपीच्या उजव्या हाताला बॅडेज करण्यात आलेले होते. सरकारी दवाखाण्यामध्ये आरोपीच्या उजव्या हाताचे बॅडेज काढून त्याची जखम पाहण्यात आली. सरकारी दवाखाण्यातील डॉक्टारानी आरोपीच्या हातावर ऑपरेशन करावे लागेल असे सांगीतले. आरोपीने सांगीतले की, त्याच्या उजव्या हातावर उदगीर येथे उपचार केलेले आहेत. आरोपीने उदगीर येथे घेतलेल्या उपचाराचे कागदपत्र माझ्याकडे सादर केले. सरकारी

दवाखाण्यातील डॉक्टारानी आरोपीस भरती करुन घेतले.

**०६.** त्याच दिवशी म्हणजे ०९.०.२.२०२२ रोजी मयत महिलेचे पोस्टमॉर्टम करतेवेळी तिच्या अंगावरील काढून ठेवलेले कपडे पोलीस हावलदार बिराजदार यानी पोलीस स्टेशनला हजर केले. ती कपडे दोन पंचासमक्ष पंचनामा करुन जप्त केली. ती कपडे पाहिल्यास मी ओळखू शकतो. आता मला दाखवलेला पंचनामा हा तोच आहे. त्यास यापुर्वीच निशाण पी ४६ देण्यात आलेले आहे. आता मला दाखवलेला टॉप हा तोच आहे. त्यास यापुर्वीच एम. ओ. १४ देण्यात आलेले आहे. आता मला दाखवलेली निकर ही तिच आहे. त्यास यापुर्वीच एम. ओ. १५ देण्यात आलेले आहे. आता मला दाखवलेली लेंगीज ही तिच आहे. त्यास यापुर्वीच एम. ओ. १६ देण्यात आलेले आहे.

**०७.** दिनांक ०९.०२.२०२२ ते १३.०२.२०२२ या कालावधीमध्ये आरोपी सरकारी दवाखाण्यामध्ये ॲडमिट होता. दिनांक १३.०२.२०२२ रोजी आरोपीस सरकारी दवाखाण्यातून डिसचार्ज देण्यात आला. मी आरोपीची दवाखाण्यातील उपचाराची कागदपत्रे हस्तगत केली. त्यानंतर दिनांक १३.०२.२०२२ रोजी आरोपी अटक केली. आता मला दाखवलेला अटक पंचनामा हा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाण पी ८३** देण्यात आले. आरोपीची पोलीस कस्टडी घेवून तपास केला.

**०८.** दिनांक १५.०२.२२ रोजी आरोपी हा गुन्हयाबाबत स्वतःहुन कबुली देत होता. त्यामुळे मी पत्र देवून तात्काळ दोन पंचाना बोलावून घेतले. ते पत्र हे एम.आय.डी.सी. प्राधीकरण यांना दिले. आता मला दाखवलेले पत्र हे तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाण पी ८४** देण्यात आले.

**०९.** आरोपीने कोणताही दबाव नसताना पंचासमक्ष निवेदन दिले की, गुन्हा करतानाची कपडे एका ठिकाणी ठेवलेली आहेत ती काढून देतो, माझ्यासोबत चला. आरोपीचा निवेदन दोन पंचासमक्ष लिहून घेतले. आता मला दाखवलेले आरोपीचे निवेदन हे तेच आहे. त्यावर माझी आरोपीची व दोन पंचाच्या सहया आहेत. त्यास यापुर्वीच निशाण पी

५० देण्यात आलेले आहे.

**१०.** त्यानंतर मी, आरोपी, दोन पंच व पोलीस स्टॉफ असे शासकिय वाहनाने पोलीस स्टेशनच्या बाहेर पडून आरोपीने सांगीतल्याप्रमाणे बाभळगांव रोडने पोलीस मुख्यालयाच्या समोर पोहोचलो आरोपीने रोडच्या बाजुला गाडी थांबवण्यास सांगीतले. आरोपीने इशारा करुन गाडीतून खाली उतरण्यास सांगीतले. त्याप्रमाणे ड्रायव्हरने गाडी थांबवली. आम्ही सर्वजन गाडीतून खाली उतरलो. आरोपी पुढे, त्याच्या पाठोपाठ दोन पंच असे आम्ही सोबत बाजुला सिमेंट बांधकामात बांधलेली नाली होती त्यात तिन फुट खोलीचा खडडा होता, त्यात आरोपीने उतरुन, हात घालून ठेवलेली कपडे काढून दिली. त्या नालीचे बांधकाम नुकतेच झालेले होते. नालीखाली पुर्ण सुखलेला भाग होता. ठेवलेली कपडे बाहेरुन कोणाला सहजासहजी दिसणार नाहीत अशी ठेवलेली होती. ती कपडे आरोपीने सादर केल्यानंतर दोन पंचासमक्ष पंचनामा करुन जप्त केली. आता मला दाखवलेला मेमोरंडम पंचनामा हा तोच आहे. त्यावर, माझी, आरोपीची व दोन पंचाच्या सहया आहेत. त्यास यापुर्वीच निशाण ५१ देण्यात आलेले आहे. ती कपडे म्हणजे टि शर्ट, जॉकीट व पॅन्ट अशी होती. आता मला दाखवलेला टि शर्ट हा तोच आहे. त्यास यापुर्वीच एम.ओ. १७ देण्यात आलेले आहे. आता मला दाखवलेले जकॅटे हे तेच आहे. त्यास यापुर्वीच एम.ओ. १८ देण्यात आलेले आहे. आता मला दाखवलेली पॅन्ट ही तिच आहे. त्यास यापुर्वीच एम.ओ. १९ देण्यात आलेले आहे.

**११.** त्यानंतर आरोपीने निवदेन दिले की, गुन्हा करुन पळून जाते वेळी त्याने वापरलेली गाडी एका ठिकाणी ठेवलेली आहे ती मी दाखवतो, माझ्यासोबत चला. त्याप्रमाणे आम्ही गाडी वळवून आरोपीने दाखवल्या रस्त्याप्रमाणे तावरजा कॉलनी येथे आलो. तावरजा कॉलनी येथे आरोपीने गाडी थांबवण्यास सांगीतली. त्याप्रमाणे गाडी थांबवली. आरोपी, पंच व आम्ही गाडीतून खाली उतरलो. आरोपीने इशारा करुन सांगीतले की ते माझे घर आहे व पुढे जावून आरोपीने गाडी दाखवली. आम्ही त्या मोटारसायकलची पाहणी केली. त्याच्या

युटीलिटी बॉक्सवर रक्ताचे डाग दिसले. आरोपीने त्या घरात आवाज दिल्याने एक महिला बाहेर आली. आरोपीने त्या महिलेस मोटारसायकलची चावी आणण्यास सांगीतले. त्या महिलेने त्या मोटारसायकलची चावी आणली. त्या चावीच्या साहयाने त्या मोटारसायकलचा युटीलीटी बॉक्स उघडला. तो युटीलिटी बॉक्स पंचासमक्ष जप्त केला. आता मला दाखवलेला युटीलिटी बॉक्स हा तोच आहे. ती मोटारसायकल सुध्दा दोन पंचासमक्ष जप्त केली.आता मला दाखवलेला युटीलिटी बॉक्स हा तोच आहे. त्यास **एम. ओ. २०** देण्यात आले. आता मला दाखलेला युटीलिटी बॉक्स व मोटारसायकल ही मेमोरंडम पंचनाम्याप्रमाणे जप्त केली. आता मला दाखवलेला मेमोरंडम पंचनामा हा तोच आहे. त्यास यापुर्वीच निशाण पी ५२ देण्यात आले. सदर घटनास्थळाचे फोटे घेतले. आता मला दाखवलेला फोटो हा आम्ही ज्यावेळेस पोलीस स्टेशनच्या बाहेर पडलो त्यावेळीचा आहे. सदर फोटमध्ये मी,आरोपी, दोन पंच व पोलीस स्टॉफ असे दिसत आहेत. माझ्या तोंडावर मास्क आहे. सदर फोटोस यापुर्वीच अर्टीकल १६ देण्यात आलेले आहे. त्यानंतरचे पाच फोटो हे बाभळगांव रोडवरील नालीतील आरोपी त्याचे कपडे दाखवितानाचे व हजर करतानाचे आहेत. सदर फोटमध्ये मी,आरोपी, दोन पंच व पोलीस स्टॉफ असे दिसत आहेत. त्या पाच फोटोग्राफना यापुर्वीच अर्टीकल १७/१ ते १७/५ देण्यात आलेले आहेत. आता मला दाखवलेले दोन फाटोग्राफ हे आरोपीच्या घरासमोरील मोटारसाकल जप्तीवेळीचे आहेत. सदर फोटोग्राफमध्ये मी,आरोपी, दोन पंच व मोटारसायकल दिसत आहे. सदर फोटोग्राफना यापुर्वीच अर्टीकल १८/१ ते १८/२ देण्यात आलेले आहेत.

**१२.** त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला परत आलो व आरोपीस लॉकअपमध्ये बंद केले.

**१३.** त्यानंतर आरोपीस हॉस्पीटलला पाठवून रक्ताचे नमुणे घेतले. आरोपीचे रक्त नमुणा मिळण्याकरीता वैदयकिय अधिकारी याना पत्र पाठवले होते. आता मला दाखवलेले पत्र हे तेच आहे. त्यास **निशाण पी ८५** देण्यात आले. मेमोरंडम पंचनामा वेळी हजर असणारे

पोलीस स्टॉफचे जबाब नोंदविले. मी साक्षीदाराचे तपास टिपन नोंदविले. साक्षीदाराचे कलम १६४ सीआरपीसी प्रमाणे जबाब नोंदविण्याकरीता प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, लातूर यांना पत्र पाठविले. मृतकाचे पोस्टमॉर्टम मिळण्याकरीता पत्र दिले व पोस्टमॉर्टम रिपोर्ट हस्तगत केला. आता मला दाखवलेले पत्र हे तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाण पी ८६** देण्यात आले. त्याप्रमाणे मला पोस्टमॉर्टम रिपोर्ट प्राप्त झाला. आता मला दाखवलेल्या पी.एम. नोटस हया त्याच आहेत. त्यास यापुर्वीच निशाण पी ६६ देण्यात आलेले आहेत.

**१४.** आरोपी विरुध्द या पुर्वीचे शिवाजी नगर पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल होते त्याची माहीती मिळविण्याकरीता मी शिवाजी नगर, पोलीस स्टेशन, लातूर येथे पत्र देवून त्याची माहीती घेतली. आता मला दाखवलेले पत्र हे तेच आहे. त्यावरी माझी सही आहे,त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाण पी ८७** देण्यात आले. सदर पत्राप्रमाणे मला शिवाजी नगर पोलीस स्टेशन येथून माहीती प्राप्त झाली. आता मला दाखवलेली माहीती ही तिच आहे. त्यावर शिवाजी नगर पोलीस स्टेशनचे संबधीत पी.आय. यांची सही. आहे. त्यास **निशाण पी ८८** देण्यात आले.

**१५.** त्यानंतर जप्त हत्याराबाबत वेपन क्यरी अहवाल मिळण्याकरीता पत्र पाठविले. आता मला दाखवलेले पत्र हे तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाण पी ८९** देण्यात आले. सदर पत्राप्रमाणे वेपन क्यूरी रिपोर्ट मला प्राप्त झाला. आता मला दाखवलेला वेपन क्यूरी रिपोर्ट हा तोच आहे. त्यास यापुर्वीच निशाण पी ६७ देण्यात आले आहे.

**१६.** त्यानंतर गुन्हयात जप्त केलेला मुददेमाल रासायनिक पृथकरनाकरीता सी.ए. नांदेड येथे पाठविला. मुददेमाल घेवून जाणा−या पोलीस कर्मचारी यांचे जबाब नोंदविले.

**१७.** सदर आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळाल्याने मी आरोपीविरुध्द दोषारोपत्र दाखल केले. मी आरोपीस ओळखतो. आज रोजी कोर्टात स्क्रीनवर दिसत असणारा आरोपी

हा तोच आहे.

(आज रोजी आरोपीस व्हीसीवर हजर करण्यात आलेले आहे. )

आरोपीतर्फे निशाण ९० वरील आदेशाप्रमाणे उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत 'समक्ष'

( डी.बी.माने)

दिनांक :–२७/०३/२०२५. अति. सत्र न्यायाधीश, लातूर

**निशाणी ९१ वरील आदेशानुसार सरतपास पुढे सुरु**

**दिनांकः– ०२/०४/२०२५**

**शपथेवर सरतपास पुढे सुरु**

**१८.** दिनांक ०६.०२.२०२४ रोजी एक सी. ए. अहवाल प्राप्त झाला तो अहवाल मी या प्रकरणी सादर केला आहे. आता मला माझे दिनांक ०६.०२.२०२४ चे पत्र दाखवले. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाण पी ९२** देण्यात आले. आता मला दाखवलेला एफएसएल, नांदेड यांच्याकडून प्राप्त झालेला अहवाल दाखविला. सदरचा अहवाल हा तोच आहे. त्यास **निशाण पी ९३** देण्यात आले. सदरचा रिपोर्ट हा व्हीसेराचा रासायनिक पृथकरणाचा आहे. उर्वरीत सी.ए. अहवाल आज रोजी प्राप्त झाले आहेत. सदरचे अहवाल सध्याचे एमआयडीची पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक यांनी दाखल केले आहेत. आता मला दाखवलेले आज रोजीचे पत्र हे तेच आहे. त्यास **निशाण पी ९४** देण्यात आले. सदर अहवालासोबत तिन रिपोर्ट दाखल करण्यात आलेले आहेत. सदर अहवालाना **निशाण पी ९५ ते ९७** देण्यात आले.

**सरतपास पुर्ण**

**विधीज्ञ श्री ए.ए. शेख यानी ॲड. नळेगांवकर हे दुस–या न्यायालयात व्यस्त असल्याचे सांगीतल्याने उलटतपास काही वेळाकरीता तहकुब**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत 'समक्ष'

( डी.बी.माने)

**दिनांक :–०२/०४/२०२५.** **अति. सत्र न्यायाधीश, लातूर**

**शपथेवर उलटतपास सुरु**

**१९.** हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले तोपर्यत

कोणतेही रासायनिक पृथकरणाचे अहवाल प्राप्त झालेले नव्हते. आम्ही व्हीसेरा रासायनिक पृथकरणाकरीता पाठविला होता. व्हीसेरा सॅम्पल हे मला सरकारी दवाखाण्यातून ०९.०२.२०२२ रोजी प्राप्त झाले. हे म्हणणे खरे आहे की, ०९.०२.२०२२ रोजी सरकारी दवाखाण्यातून व्हीसेरा प्राप्त झाला असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दोषारोपपत्रामध्ये दाखल नाही. निशान ९४ चे पत्र हे दिनांक १६.०३.२०२४ रोजी पोलीस स्टेशनला प्राप्त झाले आहे. दिनांक १६.०३.२०२४ रोजी मी एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे कार्यरत होतो. सदर पत्रावर माझ्या नावाची इन्डॉसमेंट आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाण ९५ च्या अहवालामध्ये रेफरन्स नंबर, एक्झबिट रिसीव्ह, सी.आर. नंबर, मोड ऑफ रिसीप्ट या सर्व ठिकाणी मजकुर लिहलेला नसुन त्या ठिकाणी रेशा मारलेल्या आहेत.

**कोर्टाची पहिल्या सत्राची वेळ संपल्यामुळे उलटतपास दुस–या सत्रापर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत 'समक्ष'

( डी.बी.माने)

दिनांक :–०२/०४/२०२५. अति. सत्र न्यायाधीश, लातूर

**शपथेवर उलटतपास पुढे सुरु.**

**२०.** हे म्हणणे खरे आहे की, सी.ए. तपासणीकरीता पाठविलेल्या मुददेमालापैकी काही मुददेमाल एफएसएल, नांदेड यांनी त्रुटी म्हणून परत पाठविला होता. साक्षीदार स्वतः सांगतात कारण त्यावर डॉक्टारांची सही नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, निशाण ९५ चा सी.ए. अहवाल हा वैदकिय अधिकारी यांना अॅड्रेस करण्यात आलेला आहे. डॉक्टारांच्या काय त्रुटया होत्या याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०६.०४.२०२२ रोजी मयत रेश्मा हिचे व्हजायनल स्वॅब मी पुन्हा एफएसएल नांदेड

यांच्याकडे पृथकरणाकरीता पाठविले. हे म्हणणे खरे आहे की, निशाण ७१ च्या दिनांक ०६.०४.२०२२ च्या पत्रामध्ये उल्लेखलेले सॅम्पल मी एफएसएल नांदेड यांच्याकडे पृथकरणाकरीता पुन्हा पाठविले होते. हे म्हणणे खरे आहे की, काही मुददेमाला बाबत सी.ए. ऑफीस यांनी काढलेल्या त्रुटी मी अदयापर्यंत अभिलखात दाखल केलेल्या नाहीत. सी.ए. ऑफीसने त्रुटीबाबत आमच्या कार्यालयास लेखी कळविले नव्हते. साक्षीदार सांगतात, आमचा पोलीस कर्मचारी मुददेमाल घेवून गेला त्याच दिवशी मुददेमाल पाहणी केल्यानंतर सी.ए. ऑफीसने काही मुददेमाल परत पाठविला. मुददेमाल परत पाठविल्यानंतर तो कोठे जमा केला याबाबत मी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुददेमाल सी.ए. कार्यालयात जमा केल्यानंतर त्याबाबत पावती दिली जाते. दिनांक १६ मार्च २०२२ रोजी मुददेमाल स्वीकारल्या बाबत सी.ए ऑफीसनकडून देण्यात आलेली पावती मी दाखल केली आहे. साक्षीदाराने अभिलेखावरील पावती दाखवली. सदर पावतीस **निशाण पी ९८** देण्यात आले.

**२१.** मयत रेश्मा व आरोपी अब्दुल यांच्या रक्ताचे नमुणे घेणारे डॉक्टर वेगवेगळे होते याबाबत मला सांगता येणार नाही. मला सदर दोघाचे रक्त नमुणे घेणा–या डॉक्टरांची नावे सांगता येणार नाहीत. दिनांक १७.०२.२०२२ रोजी आरोपी अब्दुलचे ब्लड सॅम्पल मला मिळाले. दि. १७.०२.२०२२ रोजी आरोपी अब्दुल हा पोलीस कस्टडीत होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर केसमधील मुददेमाल हा दिनांक १६.०३.२०२२ पर्यत मुददेमाल कक्षातच होता. ब्लड सॅम्पल सारखे मुददेमाल ठेवण्याकरीता पोलीस स्टेशनमधील मुददेमाल कक्षात फ्रिज आहे. फ्रिजची कस्टडी मुददेमाल क्लार्ककडे असते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२२ तसेच आजही एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे ब्लड सॅम्पल सारखे मुददेमाल ठेवण्याकरीता फ्रिज नाही.

**प्रश्नः–** निशाण ९६ मध्ये अनुक्रमांक ५ 'कंडीसन ऑफ पार्सल' यामध्ये 'नो कॉपी सेंड' असा मजकुर आहे याचा अर्थ काय?

**उत्तरः–** त्याबाबत मला सांगता येणार नाही.

निशाण ९६ चा रिपोर्टही दिनांक १६.०३.२०२४ रोजी पोलीस स्टेशनला दाखल झाला याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि. ९७ चा सी.ए. अहवाल वैदयकिय अधिकारी याना ॲड्रेस केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी निशाण ७१ च्या पत्रामध्ये मयत रेश्मा हिच्या डी.एन.ए. बाबत रिक्वेस्ट केलेली होती. मयत रेश्मा हिचा डी.एन.ए. ॲनालिसीस अहवाल एफएसएल यांचेकडून प्राप्त झाले नाही.

**२२.** दिनांक ०८.०२.२०२२ रोजी एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे पीएसओ म्हणून हवालदार कार्यरत होते परंतू त्यांचे नाव मला माहीत नाही. सदर दिवशी संजीवन मिरकले हे एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे पी.आय. म्हणून कार्यरत होते. दिनांक ०८.०२.२०२२ रोजी सायंकाळी पोलीस स्टेशनला आलेला फोन पीएसओ यानी रिसीव्ह केला होता. अवंती नगर हे पाखरसांगवी भागामध्ये आहे. घटनास्थळाच्या एका बाजुस शाळेची भित, एक बाजु मोकळी, व उर्वरीत दोन बाजुस राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी निघालो तेंव्हा मला पीएसओ यानी घटनास्थळाचे लोकेशन सांगीतलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या जवळ डी.एम. कॉलेज आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाजवळ कोणतीही शाळा नाही. साक्षीदार स्वत सागतात की आम्ही शाळा व कॉलेज डीफरन्स करत नाही. घटनास्थळापासुन अर्धा कि.मी. अंतरावर साने गुरुजी शाळा आहे याबाबत मला माहीत नाही.

**विधीज्ञ श्री नळेगांवर यानी तोंडी विनंती केल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत 'समक्ष'

( डी.बी.माने)

दिनांक :–०२/०४/२०२५. अति. सत्र न्यायाधीश, लातूर

**दिनांक ०८/०४/२०२५**

**शपथेवर उलटतपास पुढे सुरु**

**२३.** घटनास्थळी आमचे पी.आय. हजर होते. माझे पथक पोलीस स्टेशनमधुन १८.०८ वाजता घटनास्थळाकडे रवाना झाले. आम्ही साधारणपणे १८.२० वाजता घटनास्थळी पोहंचलो. घटनास्थळ असलेल्या खोलीचा दरवाजा उघडा होता. मला पंचाना पत्र पाठविण्याकरीता साधारण अर्धा तास वेळ लागला. हे म्हणणे खरे आहे की, नगर पालिकीचे आयुक्त याना पंच मिळण्याकरीता पत्र दिले. साक्षीदार सांगतात तत्पुर्वी आमचे पी.आय. यांनी महानगर पालिका आयुक्त यांना पंच लागणार आहेत म्हणून फोनवरुन कळविले होते. १८.४० वा. पंच घटनास्थळी पोहंचले. मी पत्र दिल्यानंतर पंच घटनास्थळी आले. घटनास्थळ ते महानगर पालिका, लातूर हे अंतर ३ कि.मी. इतके आहे. श्वान पथक व अंगुलीमुद्रा तज्ञ हे सुध्दा साधारणता १८.४० वा. घटनास्थळी पोहंचले. हे म्हणणे खरे आहे की, श्वान पथक व अंगुलीमुद्रा तज्ञ ही पथके एस पी ऑफीस येथे आहेत. घटनास्थळाची पाहणी पी.आय. यानी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळला भेट दिली तेंव्हा शासकिय फोटोग्राफर माझ्यासोबत उपलब्ध नव्हता. मी फॉरेन्सीक टिमला सुध्दा पाचारण केले होते व ते माझ्यासोबत आले होते. फॉरेन्सीक टिमने मला मदत केली. श्वान पथक हाताळाणा–या कर्मचा–याचे नाव मला माहीत नाही. अंगुलीमुद्रा तज्ञ यांनी घटनास्थळावरुन काही फिग्रंर प्रिंट घेतल्या का हे मला माहीत नाही. मी एम.ओ. नं. १ हा चाकू अंगुलीमुद्रा तज्ञ यांना तपासणीसाठी दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या चाकूच्या मुठीला रक्त लागलेले होते. त्या चाकुवरील रक्त ब–यापैकी सुकले होते.

**२४.** हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ असलेल्या खोलीमध्ये ब–यापैकी रक्त पडलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ असणा–या खोलीमध्ये फरशी होती. घटनास्थळावरुन रक्ताचे नमुणे मी स्वतः घेतले. हे म्हणणे खरे आहे की, मी रक्ताचे नमुणे हे चार कापसाच्या बोळयाने वेगवेगळया ठिकाणावरुन घेतले. मी ते कापसाचे बोळे ठेवण्याकरीता

चार स्वतंत्र पाकीटाचा वापर केला.

**२५.** रासायनिक विश्लेषक हे जैवीक नमुणे तपासणीनंतर नष्ट करते याबाबत मला सांगता येणार नाही. मी चार कापसाचे बोळे कोर्टात दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी कोर्टात एकच कापसाचा बोळा दाखल केला आहे. घटनास्थळ पंचनामा करतेवेळी फोटो घेतले. मी घटनास्थळी जेथे चाकू, रक्त पडले होते त्या ठिकाणाला रेखाकिंत केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी दोषारोपपत्र दाखल करे पावतो मला श्वान पथकाचे व अंगुलीमुद्रा तज्ञाचे अहवाल मिळाले नाहीत. ३०२ सारख्या गंभीर गुन्हयात श्वान पथक, अंगुलीमुद्रा तज्ञ व फॉरेन्सीक तज्ञ यांचे रिपोर्ट दोषारोपपत्र दाखल करण्यापुर्वी सादर करावे असा नियम आहे याबाबत मला माहीत नाही. मी दोषारोपपत्र दाखल करेपावतो श्वान पथक, अंगुलीमुद्रा तज्ञ व फॉरेन्सीक तज्ञ यांना त्यांचे रिपोर्ट दाखल करण्याबाबत पत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी श्वान पथक, अंगुलीमुद्रा तज्ञ व फॉरेन्सीक तज्ञ यांना या केसमध्ये साक्षीदार म्हणून नमुद केलेले नाही.

**२६.** आरोपी अब्दुल यास अटक केल्यानंतर त्यांच्या हाताचे ठसे घेतले नाहीत. साक्षीदार स्वतः सांगतात तथापी आरोपीला अटक करतेवेळी त्याच्या हाताचे ठसे ॲबींस प्रणालीमध्ये घेतले होते. तसेच आरोपीच्या उजव्या हाताला बॅडेज पटटी होती त्यामुळे त्याच्या हाताचे ठसे घेता आले नाहीत. आरोपीच्या उजव्या हाताचे पुर्ण बोटे व मनगट याना बॅडेज होते.

**प्रश्नः–** श्वान पथक, अंगुलीमुद्रा तज्ञ यांनी त्यांचे अहवाल तुमच्याकडे दोषारोपपत्र दाखल करण्यापुर्वी दाखल केले होते ?

**उत्तरः–** मला प्राप्त झाले नव्हते.

हे म्हणणे खरे नाही की, श्वान पथक, अंगुलीमुद्रा तज्ञ व फॉरेन्सीक तज्ञ या सर्वाचे अहवाल प्रतीकुल होते म्हणून मी ते अहवाल मला मिळालेले नाहीत असे खोटे सांगतो.

**२७.** ज्याने घटनास्थळ दाखविले तो मयत महिलेचा भाउ होता. हे म्हणणे खरे

आहे की, घटनास्थळ दाखविणारा व्यक्ती इम्राण सादीक शेख रा.वसवाडी येथील होता. सादीक शेख यास साक्षीदार म्हणून तपासलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाण ४४ घटनास्थळ पंचनाम्यावर महिला पंचाची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनास्थळीच मरणोत्तर पंचनामा करणे शक्य होते. हे म्हणणे खरे आहे की, मरणोत्तर पंचनाम्याच्या वेळी मृतदेह ओळखणार व्यक्ती इम्राण शेख हा होता.

२८. हे म्हणणे खरे आहे की, डॉ. अक्षता इगे तिने मृतदेह दाखविला. हे म्हणणे खरे नाही की, मरणोत्तर पंचनाम्यातील जखमाचे मोजमाप डॉ. अक्षता इगे यानी दिले. मयताच्या हाताच्या मुठी वळालेल्या होत्या. घटनास्थळाचे व मरणोत्तर पंचनाम्याचे फोटो माझ्या मोबाईलमध्ये योगेश चिंचोलीकर याना काढले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर फोटोची हॅश व्हल्यू काढली नाही तसेच पुराव्याचे कायदयाचे कलम ६५ बी चे प्रमाणपत्र घेतलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, डॉ. अक्षता इगे याना साक्षीदार म्हणून दाखविलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ व इनक्वेष्ट पंचनाम्यामध्ये मध्ये आरोपी हा मयत महिलेचा पती असू शकतो असा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, असा संशय व्यक्त करणारा सादीक शेख होय. साक्षीदार स्वतः सांगतात सादीक शेख तसेच घटनास्थळी असलेल्या लोकांनी तसा संशय व्यक्त केला होता. घटनास्थळी किती लोक होती हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी जमलेल्या कोणाही व्यक्तीस साक्षीदार म्हणून घेतलेले नाही.

प्रश्नः– तुम्हांला घटनास्थळीच आरोपी अब्दुल हा उदगीर येथे आहे याची माहीती मिळाली होती ?

उत्तरः– आरोपी अब्दुल आहे हे मला समजले होते. तो उदगीर येथे आहे याबाबत मला गोपनिय माहीती मिळाली होती.

ती गोपनिय माहीती ही माझ्यासोबत तपास पथक होते त्याना ती माहीती होती. हे म्हणणे खरे आहे की, गुन्हा नोंद झाल्यानंतर पुन्हा तपास माझ्याकडे देण्यात आला. आरोपीकडे मोबाईल

मिळून आला नाही. मयत रेश्मा हिच्याजवळही मोबाईल मिळून आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दोन सहाय्यक पोलीस अधिक्षक, व एक डेप्यूटी पोलीस अधिक्षक यानी घटनास्थळाला भेट दिली होती. आरोपी हा उदगीर येथे आहे हे माहीत होते तथापी त्याच्या लोकेशनची माहीती होते का याबाबत मी सांगु शकत नाही.

**२९.** एम.ओ. नंबर १ हा चाकू सरकारी दवाखाण्यात वेपन क्यूरी करण्याबाबत दि. १४.०३.२०२२ रोजी पाठविला होता. साक्षीदार स्वतः सांगतात त्यापुर्वी एक पत्र सरकारी दवाखाण्यात पाठविले होते. साक्षीदार सांगतात दि.०९.०३.२२ रोजी वेपन क्यूरीबाबत पात्र पाठविले त्याचा अहवाल दि १४.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला. डॉक्टरानी हत्याराची जेव्हा प्रत्यक्ष पाहणी केली तेंव्हा मी तेथे हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, हत्याराची पाहणी केल्यानंतर वैदयकिय अधिकारी ते हत्यार पॅक करतात व त्यांचे स्वतःचे सिल व सही करतात. आज रोजी एम.ओ. नं. १ हा चाकू ज्या पाकीटात आहे त्यावर डॉक्टाराचे सिल अथवा सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ. नं. १ हा चाकू वाकलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा चाकू एका बाजुने धारधार आहे व दुस–या बाजुने नाही. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ. १ या चाकुवर पिवळया रंगाने लावलेल्या टॅगवर १२.१२.२०२२ अशी तारीख आहे. हे म्हणणे खरे नाही की, एम.ओ. नं. १ हा चाकू त्यावरील पिवळया रंगाच्या टॅगमुळे या केसमधील आहे असे सिध्द होत नाही.

**३०.** दिनांक ०९.०२.२०२२ रोजी आमच्या पोलीस टिमने आरोपीला उदगीर येथून ताब्यात घेतले. असे घडले न्हव्हते की मी स्वतः आरोपीला ताब्यात घेण्यासाठी उदगीर येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, ०९.०२.२०२२ रोजी आरोपीस ज्या पोलीस कर्मचा–यानी उदगीर येथून ताब्यात घेतले त्याना या केसमध्ये साक्षीदार म्हणून घेतलेले नाही. आरोपीला ज्यानी उदगीर येथे ताब्यात घेतले त्यांनी त्याबाबतची नोंद उदगीर पोलीस स्टेशन येथे केली का याबाबत मला सांगता येणार नाही. डॉ. मुंदडा यांचे रिपोर्ट आम्ही आरोपीकडून ताब्यात घेतले. आमच्या पोलीसानी डॉ. मुंदडा यांच्याकडून रिपोर्ट प्राप्त करुन

घेतले होते का याबाबत मला सांगता येणार नाही. डॉ. मुंदडा याचे वैदयकि पेपर्स आरोपीकडून ताब्यात घेतल्यानंतर त्याचा पंचनामा केला नाही. आरोपी उगदीर येथील डॉ. मुंदडा याच्याकडे ॲडमिट होता याबाबत मला सांगता येणार नाही. मी डॉ. मुंदडा यांचा जबाब नोंदविला नाही. मी डॉ. मुंदडा याच्याकडे चौकाशी केली नाही. आता मला दोषारोपत्रासोबतचा पान नंबर डी ३९ हा कागद दाखविला सदरचा डाक्यूमेंट साक्षीदारास रेफर केल्याने **निशाण डी. ९९** देण्यात आले.

(कोर्टाची दुस–या सत्राची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब.)

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत 'समक्ष'

( डी.बी.माने)

दिनांक :–०८/०४/२०२५. अति. सत्र न्यायाधीश, लातूर

**दिनांकः– २२.०४.२०२५**

**शपथेवर उलटतपास पुढे सुरु**

**३१.** आता मला निशाण डी ९९ डॉक्टरचे पत्र दाखवले. मी सदर पत्राच्या अनुषंगाने पुढे काही तपास केला नाही. सदरचे पत्र डॉ. सई देवंग्रे श्री हॉस्पीटल शिरुर अनंतपाळ यांचे आहे. सदर पत्रामध्ये आरोपीच्या नावाचा उल्लेख असुन त्यात विक्रम राठोड यांच्याकडे रेफर केल्याचे दिसुन येत आहे. सदरचे पत्र हे आरोपी दवाखाण्यात जावून उपचार घेवून आल्यानंतर आरोपीकडून घेतले आहे. सदरचा डाक्यूमेंट आरोपीकडून घेतला तेंव्हा आरोपी आमच्या ताब्यात होता.

**३२.** आरोपीला दिनांक ०९.०२.२०२२ रोजी ताब्यात घेतले व त्यांनी नोंद स्टेशन डायरीला घेतली. आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्यांची अंगझडती घेतली नाही. ज्या पोलीस टिमने आरोपीला कोमल हॉस्पीटल उदगीर येथून ताब्यात घेतले त्या ठिकाणी त्यास ताब्यात घेतल्याबाबतचा पंचनामा केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीवर जीएमसी, लातूर येथील ज्या वैदयकिय अधिकारी यांनी उपचार केले त्यास साक्षीदार म्हणून दर्शविलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीवर सरकारी दवाखाना लातूर येथे ऑपरेशन करण्यात आले होते. आता मला दिनांक ०९.०२.२०२२ रोजीचे पत्र दाखविले ते पत्र मीच दिलेले होते. सदरचे पत्र साक्षीदारास उलटतपासात दाखविल्याने त्यास **डी १००** देण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, दि. १०.०२.२०२२ रोजी वरिष्ठ वैदयकिय अधिकारी यानी अब्दुल यास ॲडमिट करुन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. १४.०२.२०२२ वरिष्ठ वैदयकिय अधिकारी डॉ. गणेश आसावा यानी आरोपीस जीएमसी, लातूर येथून डिसचार्ज केले.

**३३.** आरोपीचे रक्त नमुणा मिळण्याबाबाबत दि. १७.०२.२२ या तारखेला पत्र पाठविले व त्याच दिवशी मला आरोपीचा रक्त नमुणा मिळाला.

**३४.** लातूर ते उदगीर हे अंतर अंदाजे ७० कि.मी. एवढे आहे. लातूर ते शिरुर

अनंतपाळ हे अंतर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, उदगीर व शिरुर अनंतपाळ हे वेगवेगळे तालुके आहेत.

**३५.** हे म्हणणे खरे आहे की, मयताचे वडीलांचे घर व आरोपीचे घर हे लातूर शहरात एकमेकाच्या विरुध्द दिशेला आहेत. संपूर्ण लातूर शहर सीसीटीव्ही कॅमरेखाली येते याबाबत मला माहीत नाही. आम्ही आरोपीचे नाव समजल्यानंतर त्याचा मोबाईल मॉनीटर केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी मी टीव्ही चॅनेलला मुलाखत दिली होती.

**३६.** आरोपीची कपडे जेथून जप्त झाली त्या ठिकाणाहुन १०० ते २०० मिटर अंतरावर पोलीस ट्रेनींग सेंटर आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ट्रेंनीग सेटरच्या आलीकडे पोलीस मुख्यालय आहे. पोलीस मुख्यालयाच्या विरुध्द बाजुला पोलीसाचे निवासस्थान आहेत याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस मुख्यालय तसेच पोलीस ट्रेंनीग सेंटर हे बाभळगांव रोडला लागुन आहे. पोलीस ट्रेंनीग सेंटरच्या प्रवेश व बाहेर जाण्याच्या गेटवर २४ तास पोलीस कर्मचारी असतात याबाबत मला सांगता येणार नाही. पोलीस ट्रेंनीग सेंटर व पोलीस मुख्यालयाच्या गेटवर सीसीटीव्ही कॅमरे बसविले आहेत याबाबत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणीपुर्वक दोन्ही ठिकाणीचे सीसीटीव्ही कॅमरे फुटेज जप्त केलेले नाहीत.

**३७.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या मोटारसायकल जप्तीबाबत वेगळा पंचनामा तयार केला नाही. आरोपीच्या मोटारसायकल जप्तीचा फोटोग्राफ माझ्या मोबाईलने माझ्या ड्रायव्हरने काढले. मी फोटोग्राफचे हॅश व्हल्यू प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, फोटोग्राफ अर्टीकल १८/१ व १८/२ हे फोटोग्राफ काढतेवेळी जीपीएस लोकेशन चालू नव्हते. मी आरोपीच्या बहीणीचा जबाब नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्टीकल १८/१ व १८/२ हे फोटोग्राफ उदगीर शहरातील आहेत.

**३८.** हे म्हणणे खरे आहे की, निशाण पी ५० मध्ये आरोपीने कोणताही दबाव नसताना असा उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी सरकारी दवाखाना,

लातूर येथे असताना त्या ठिकाणी आमचे पोलीस पथक तैनात होते. हे म्हणणे खरे नाही की,०९/०२/२०२२ तारखेपासुन ते आरोपीला अटक करे पावितो आरोपीवर भरपुर दबाव टाकला.

**३९.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपी लातूर येथून उदगीरला गेला याकरीता मी कोणताही साक्षीदार तपासलेला नाही.

**४०.** हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनामा निशाण ४४ केला असे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, एम. ओ १ ते एम ओ ११ या वस्तू घटनास्थळावरुन जप्त केल्या असे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मी मरणोत्तर पंचनामा निशाण ४५ केला असे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने त्याच्यावर उपचार घेतलेले कागदपत्र सादर केले असे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मी मयताचे कपडे निशाण ४६ च्या पंचनाम्याप्रमाणे जप्त केले असे मी खोटे सांगतो.

**४१.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने निवेदन पंचनामा निशाण ५० दिलेला नाही व त्याच्या निवेदनाप्रमाणे कपडे व मोटारसायकल जप्त केले असे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मोटारसायकलच्या युटीलिटी बॉक्सच्या वर (एम.ओ २०) रक्ताचे डाग दिसुन आले असे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला हॉस्पीटलला पाठवून त्याच्या रक्ताचे नमुणे घेतले असे मी खोटे सांगतो.

**४२.** हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी याकुब इस्माईल शेख याची फिर्याद मी नोंदविलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या सांगणेवरुन आरोपीस आरोपी

म्हणून समाविष्ठ करुन त्याच्या विरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत 'समक्ष'

( डी.बी.माने)

दिनांक :–२२/०४/२०२५. अति. सत्र न्यायाधीश, लातूर